


दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक



● वर्ष : ०२ ● अंक : १११ ● पुणे ● गुरुवार, दि. ११ मार्च २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313



# पुण्यात काँग्रेसला खिंडार

## मविआचा हुकुमी एक्का शिवसेनेच्या गळाला

- बाळासाहेबांचे विचार जपले असते तर कोणी कुठे गेले नसते
- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची उबाठावर घणाघाती टीका

### रवींद्र धंगेकर यांचा शिवसेनेत प्रवेश

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

हिंदुहृयसम्राट बाळासाहेब ठाकरेंचा नकली आवाजातील व्हिडिओ करण्यापेक्षा त्यांचे विचार जपले असते तर कोणी कुठे गेले नसते, अशी घणाघाती टीका शिवसेनेचे मुख्य नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उबाठावर केली. काँग्रेसचे पुण्यातील माजी आमदार रवींद्र धंगेकर यांनी कार्यकर्त्यांसह शिंदे यांच्या उपस्थितीत आज शिवसेनेत प्रवेश केला. यावेळी शिवसेना उपनेते डॉ. नीलम गोऱ्हे, मंत्री उदय सामंत, आमदार शरद सोनावणे, आमदार प्रकाश सुर्वे, माजी खासदार आनंदराव अडसूळ उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, रवींद्र धंगेकर यांनी पुन्हा एकदा धनुष्यबाण उचलला आणि भगवा हाती घेतला. रवींद्र धंगेकर हे पुण्यातले लोकप्रिय लोकनेता म्हणून त्यांची ओळख आहे. कामातून त्यांनी ओळख निर्माण केली. ते २५ वर्ष नगरसेवक होते. त्यापैकी शिवसेनेचे १० वर्ष नगरसेवक होते. शिवसेनेत आल्याने आता लोकांना कळेल धंगेकर कोण, असे शिंदे म्हणाले. तुमचा जनसंपर्क पाहता लवकरच पुण्यातून हजारो कार्यकर्ते शिवसेनेत येतील, असा विश्वास यावेळी शिंदे यांनी व्यक्त केला. लोकसभा निवडणुकीत धंगेकर यांना ४ लाख ६० हजार मते मिळाली. यातून तुमचे काम आणि लोकप्रियता दिसून येते, अशा शब्दांत शिंदे यांनी धंगेकर यांचे कौतुक केले.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, मी एक सर्वसामान्य कार्यकर्ता पण मला लोकांनी हलक्यात घेतलं. त्यानंतर जे घडलं त्याची देशाने नाही तर जगातील ३३ देशांनी दखल घेतली. एक सामान्य कार्यकर्ता काय करु शकतो हे जगाने पाहिले. शिवसेनेकडून ८० पैकी ६० आमदार निवडून आले आणि खरी शिवसेना कोणाची यावर जनतेने शिक्कामोर्तब केले. हिंदुह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांचे विचार आपण पुढे घेऊन चाललोय, असे ते म्हणाले. कार्यकर्त्यांच्या खांद्याला खांदा लावून त्याला बळ देणारे आपण आहोत कपडे सांभाळणारे नाहीत, असे शिंदे म्हणाले. खुर्चीसाठी २०१९ मध्ये ज्यांनी मोह केला त्यांना जनतेने विधानसभा निवडणुकीत धडा शिकवला. आपल्याला खुर्चीचा मोह नाही महाराष्ट्राला पुढे न्यायचे हा एकच ध्यास आहे. सोन्याचा चमचा घेऊन जन्माला आलो नाही तर सर्वसामान्यांच्या आयुष्यात सोन्याचे दिवस आणण्यासाठी आमचा जन्म झालाय असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

ते पुढे म्हणाले की, बाळासाहेबांच्या नकली आवाजातील व्हिडिओ दाखवण्यात आला. बाळासाहेबांचे जुन्या रेकॉर्ड्स जपून ठेवल्या आहेत असे ते सांगतात पण नकली लोक नकलीच कामे करणार असा टोला त्यांनी यावेळी उबाठावर लगावला. याऐवजी बाळासाहेबांचे विचार जपले असते तर फायदा झाला असता, कोणी कुठे गेले नसते, अशी टीका उपमुख्यमंत्री शिंदे यांनी केली.

धंगेकर म्ङणाले की, शिवसेनेचा १० वर्ष नगरसेवक होतो. मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे यांनी अडीच वर्षात सर्वसामान्यांना न्याय देण्याचे काम महाराष्ट्राने पाहिले. कॉमन मॅन म्हणून शिंदे यांनी काम केले त्यांच्याच पावलावर पाऊल टाकण्याचा प्रयत्न करु, अशी भावना धंगेकर यांनी व्यक्त केली. धंगेकर यांच्यासमवेत सुरेश जैन, बाळासाहेब आंबरे, प्रणव धंगेकर, गोपाळ आगरकर, मिलिंद अहेर, अजित ढोकरे, रवींद्र खेडेकर, संजय पासोलकर, सतीश ढगे, राजू नाणेकर आदी कार्यकर्त्यांनी शिवसेनेत यावेळी प्रवेश केला. यामुळे पुण्यात काँग्रेसला खिंडार पडले आहे.




## ठळक बातम्या

### पुण्यात चाललंय काय?

**पुणे (आरंभ पर्व):** येरवडा चौकात बड्या बापाच्या पोराने लघुशंका केल्याचं प्रकरण ताजं असताना आता पुन्हा एक असाच प्रकार समोर आलाय. धक्कादायक म्हणजे लघुशंका केल्याचा जाब विचारल्या प्रकरणी पती-पत्नीवर तिघांनी कोयत्यानं वार केले आहेत. या प्रकरणी तिघांविरोधात खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. एडी भाईच्या मुलानं हे कृत्य केलं असल्याची माहिती समोर येतेय. याबाबत मिळालेली माहिती अशी की, वडगाव इथं पती पत्नी कट्ट्यावर बसले होते. त्यावेळी त्यांच्या शेजारीच उभा राहून एक तरुण लघुशंका करत होता. त्या दाम्पत्याने तरुणाला हटकल्याच्या कारणावरून तीन तरुणांनी पतीच्या डोक्यात कोयत्याने वार केले. पतीला पकडून त्यांनी आम्ही इथंच लघवी करणार, आम्ही एडी भाईची मुलं आहोत. मला अडवणार काय? आज तुझी विकेटच टाकतो असं बोलून वार केले. धायरी इथं राहणाऱ्या ३७ वर्षीय महिलेनं या प्रकरणी पोलिसात तक्रार दाखल केलीय. महिला आणि तिचा पती कामावरून दुचाकीने घरी जात होते. त्यावेळी ते काही वेळ क्षेत्रीय कार्यलयाच्या समोर असेल्या कट्ट्यावर बसून गप्पा मारण्यासाठी थांबले. रात्री आठ वाजता ते जिथं बसले होते तिथं एक दुचाकी थांबली. दुचाकीवरून तिघे उतरले आणि एक जण शेजारीच लघुशंका करायला लागला. तरुण तिथेच लघुशंका करत असल्यानं पतीने तरुणाला जाब विचारला. महिलांसमोरच लघवी करतोयस का असं विचारल्यानंतर तरुणाने शिवीगाळ केली.








# चक दे इंडिया!




दुबईच्या अरबी वाळवंटात रोहित शर्माने स्वतःची एक परिकथा रचली आणि त्यामुळे भारत चॅम्पियन ट्रॉफी जिंकू शकला. त्यात भारताने सर्वाधिक वेळा ही ट्रॉफी जिंकण्याचा पराक्रम नोंदवला आणि भारताने चॅम्पियनशिप जिंकवण्यासाठी स्वतःचे अनेक पैलू दाखवले. दुबई येथे झालेल्या या रोमांचक थ्रिलर सामन्यात एका थिलर चित्रपटाचे सर्व गुण होते. रोहितवर अलीकडे त्याच्या खराब फॉर्मसाठी प्रचंड टीकेला सामोरे जावे लागले होते आणि रोहितने आता निवृत्त व्हावे अशी टीका त्याच्यावर क्रिकेट रसिकांकडून सुरू होती. या रोहित आणि त्याच्या टीमच्या विजयाच्या मार्गात जरूर अडथळे होते पण रोहित आणि त्याच्या टीमने ते सारे पार करून चॅम्पियनशिप जिंकली आणि विरोधकांच्या टीकेला निरुत्तर केले. २५२ धावांचा पाठलाग करताना रोहितच्या बॅटमधून चौकार आणि षटकार पडत होता आणि त्याच्या आक्रमक फलंदाजीपेक्षा त्याचे खेळातील बारकाव्यांवरील प्रभुत्व विजयाला आकार देत होते. त्याला साथ दिली ती दुसरा फलंदाज श्रेयस अय्यर आणि शुभमन गिल. यांच्या साथीमुळे आपल्याला विजय मिळवता आला. रोहितचे फिरकी गोलंदाज त्याच्या मदतीला धाऊन आले आणि मग भारताने इतिहास रचला.

भारताने या सामन्यात सामना जिंकला आणि भारतीयांना गर्वाने मान ताठ करण्याची संधी दिली. अखेर के. एल. राहुलने एक षटक शिल्लक असतानाच सामन्यावर भारताची मोहर उमटवली आणि भारताचा दुष्काळ संपवला. या सामन्यात भारतासाठी काही घटक महत्त्वाचे ठरले हे जरी असले तरी सुरुवातीपासूनच रोहित शर्माने शुभमन गिलसोबत भक्कम पाया रचला, त्यानंतर मधल्या फळीत श्रेयसने अक्षर पटेलसह उत्कृष्ट भागीदारी रचली आणि लोकेश, राहुलसह हार्दिक पांड्याची गोलंदाजी किवींना भारी ठरली. रवींद्र जडेजाने चौकार मारत भारताचा विजय पक्का केला. या विजयामुळे भारताने या प्रकारच्या मालिकेत आणि इतिहासात आपले वर्चस्व प्रस्थापित केलेच पण सर्वात यशस्वी संघ असा नावलौकिकही प्राप्त केला. भारत आता ही मालिका सर्वाधिक वेळा जिंकणारा संघ ठरला आहे. चॅम्पियन ट्रॉफी ही स्पर्धा मिनी वर्ल्ड कप म्हणून ओळखली जाते आणि त्यात जगातील आठ टॉपचे संघ सामील होत असतात. त्या दृष्टीने आपला विजय हा खूप महत्त्वाचा ठरतो. या सामन्यात अत्यंत हाय स्टेक्स लागलेले असतात आणि त्यामुळे ही स्पर्धा जिंकेल तोच जगज्जेता म्हणून समजला जातो. चॅम्पियन ट्रॉफी ही त्यातील रोमांचक सामन्यांसाठी ओळखली जाते आणि प्रेक्षक आपल्या आसनांच्या कडांवर येऊन सामन्याचा थरार पाहण्यास बसलेले असतात. असा थरार त्यांना फुटबॉल किंवा हॉकीतच पाहायला मिळतो. त्यामुळे या सामन्यांचे महत्त्व आगळेच आहे आणि त्यात भारताने तीन वेळा ही स्पर्धा जिंकून आपणच क्रिकेट विश्वाचे बॉस आहोत हे सिद्ध केले आहे. ही ट्रॉफी म्हणजे क्रिकेटमध्ये मिळवलेल्या योगदानाचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठीच आहे आणि त्यावर भारत पुरेपूर कसोटीस उतरला आहे. रोहित या सामन्यातील विजयाचा शिल्पकार ठरला तरीही तो सध्या त्याच्या करिअरच्या उतरत्या वर्षात आहे. त्याच्यावर प्रचंड टीका होत होती आणि त्याने निवृत्त व्हावे असा मोफतचा सल्लाही दिला जात होता. ऑस्ट्रेलियात झालेल्या भारताच्या निराशाजनक कामगिरीनंतर रोहित आणि विराट यांच्यावर चौफेर टीका झाली. पण त्या सर्व टीकांना पुरून उरत या दोघांनीही आपल्यात अजून पुष्कळ क्रिकेट शिल्लक आहे याची ग्वाही दिली. याच सामन्यानंतर रोहित निवृत्त होणार अशी चर्चा होती. अनेक पत्रकार तर रोहितच्या पोस्ट मॅच कॉन्फरन्ससाठी बसले होते. पण त्यांच्या पदरी निराशा आली आणि भारतीयांच्या जल्लोषात अवघा देश बुडून गेला.

रोहितने आपला निवृत्तीचा निर्णय घेतला नाही आणि त्यामुळे हजारो भारतीय क्रिकेट रसिकाचा जीव भांड्यात पडला. भारताकडे या सामन्यात बेस्ट बॉलिंग लाईनअप होती, बेस्ट फलंदाजी होती आणि सारे काही घटक जुळून आले होते. त्यामुळे या विजयाचे श्रेय रोहित आणि त्याच्या सहकाऱ्यांचे आहे. कुलदीप यादव आणि रवींद्र जाडेजा यांची गोलंदाजी आणि शुभमन गिल आणि रोहित शर्मा यांची फलंदाजी तसेच अय्यरने त्यांना दिलेली साथ याबरोबरच के. एल. राहुल याची फलंदाजी या सर्वांच्या जोरावर रोहितची टीम स्पर्धेत विजयी झाली आणि या सामन्यातच नव्हे तर संपूर्ण स्पर्धेत भारत अपराजित राहिला आणि प्रत्येक सामन्यात सर्वच खेळाडूंनी योगदान दिले आहे. भारताचा प्रवास तसा सोपा होता, असे आता म्हटले जात आहे. कारण भारताने एकही सामना पाकिस्तानात खेळला नाही आणि त्यांना हा फायदा मिळाला असे काही इंग्लिश वर्तमानपत्रे म्हणत आहेत. पण त्यांची ही बोंब भारताच्या विजयामुळे आहे हे उघड आहे, कारण यापूर्वी भारताला कसोटी सामन्यात ढापले जात होते तेव्हा हीच वर्तमानपत्रे काहीही बोलत नव्हती. दुरंगी सामन्यात इंग्लंडचा संघ भारताच्या दौऱ्यावर आला तेव्हा इंग्लंडचा जॉन लिव्हर याने भारताच्या फलंदाजाना ढापले होते. त्याविरोधात कुणी आवाज उठवला नव्हता. पण आज तशी परिस्थिती राहिलेली नाही. आज परदेशी संघांच्या समोर दबणाऱ्यांपैकी भारत नाही हे त्याने दाखवून दिले आहे. भारत आज जशास तसे उत्तर देत आहे आणि हे काही परदेशी पत्रकारांना सहन होत नाही आणि त्यामुळे त्यांच्या तक्रारी आहेत की, भारतासाठी फायद्याच्या मॅचेस ठेवल्या गेल्या. पण तसे काही नाही. दुबईत भारताचे सारे सामने झाले पण त्याही खेळपट्ट्या भारतासाठी सोयीच्या नव्हत्याच. भारताचा प्रशिक्षक गौतम गंभीरने अशी टीका करणाऱ्यांना सडेतोड उत्तर दिले आहे. भारत हा आजपर्यंत पांढऱ्या चेंडूचा राजा आहे आणि हे भारताने पुन्हा सिद्ध केले आहे. आता यावर काही प्रतिक्रिया उमटतील, तर त्यांच्याकडे लक्ष देऊ नये हेच खरे.

## जागतिक महिला दिनानिमित्त महिला प्रवाशांचे पीएमपीएल बसमध्ये

# गुलाब पुष्प देऊन उस्फूर्तपणे स्वागत



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

**लक्ष्मण साबळे**

पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड पुणे यांच्यावतीने जागतिक महिला दिनानिमित्त व्यवस्थापकीय संचालिका माननीय सौ दीपा मुधोळ/ मुंडे मॅडम यांच्या मार्गदर्शनानुसार विविध स्थानकावर महिला प्रवाशांचे 8 मार्च रोजी उत्स्फूर्तपणे स्वागत करण्यात येत असून स्वारगेट आगाराचे व्यवस्थापक मा.शैलेंद्र नाईक साहेब यांच्या आव्हानानुसार धायरी मारुती मंदिर बस स्थानक धायरी सिंहगड रोड या ठिकाणी स्थानक प्रमुख मा,रवींद्र डावरे यांच्या हस्ते व सोशल वर्कर सौ संजीवनी आगलावे, वाहक समाजसेवक तानाजी कांबळे, लालू बोबडे, चालक खंडू जाधव, पवार, महेश काळे, व महिला प्रवासी भरती गवळी,अलका लवटे, पल्लवी येनपुरे,योगिनी मोहिते व स्थानिक नागरिक यांनी बसमधील सर्व महिला प्रवाशांचे गुलाब पुष्प देऊन एका अनोख्या पद्धतीने स्वागत केलं.


याबद्दल महिला प्रवासी व इतर प्रवाशांनी चालक वाहक यांचे खूप खूप आभार मानले आनंद व्यक्त केला. प्रथम असा अनुभव घेत असून आम्ही पी एम पी एल च्या सेवेबद्दल खुश आहोत असे भावना महिलांनी व्यक्त केल्या . यावेळी मनोगत व्यक्त करताना वाहक तानाजी कांबळे म्हणाले पुणे महानगर परिवहन महामंडळ सेवा ही पुणेकरांची जीवनवाहिनी असून दररोज नियमितपणे कामावर येता जाता सर्व महिला प्रवासी व इतर कामगार वर्ग, विद्यार्थी, विद्यार्थिनी, ज्येष्ठ नागरिक, मध्यम वर्गातील सर्वसामान्य, प्र जात येत असतात पी एम पी चा प्रवासा हा सुरक्षित प्रवास असून रात्री आप रात्री महिलांना उशिरा प्रवास करताना सर्व चालक वाहक यांचे प्रवासादरम्यान सहकार्य लाभत असते व ते सातत्याने सुरक्षित व वेळेत कशाप्रकारे आपल्याला सेवा देता येते येईल व प्रवाशांची सोय होईल हेच उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून सर्व कर्मचारी व इतर विभागातील कर्मचारी अधिकारी काम करत असतात त्याचप्रमाणे सर्व प्रवाशांचेही कर्मचाऱ्यांना सहकार्य होणं अपेक्षित आहे .

आज महिला दिनानिमित्त ही भरपूर प्रमाणात महिला प्रवाशांची संख्या मोठ्या प्रमाणात होती. पुणे महानगर परिवहन महामंडळ नेहमीच महिलांसाठी अनेक उपक्रम राबवत असते. याशिवाय बस मध्ये संपूर्ण डावी बाजू ही फक्त पीएमपीएल मध्येच महिलांसाठी राखीव आहे .महिलादिनी आज तेजस्विनी बसमधून सर्व महिलांना मोफत प्रवासाचा आयोजन केले होते याचा महिलानी मोठ्या प्रमाणात लाभ घेतला. पीएमपीएल सेवेबद्दल चांगल्या प्रकारे भावना बोलून दाखवल्या यावेळी इतर कामगार व स्थानिक नागरिक प्रवासी उपस्थित होते.

# टेलरिंग व्यवसायातून दिला कुटुंबाला आधार

**लक्ष्मण साबळे** | **जागतिक महिला दिन विशेष**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



दिपाली कांबळे यांचे बारावी कॉमर्स पर्यंत शिक्षण झालेले असून काहीतरी करण्याची जिद्द मनामध्ये होती .फॅशन डिझायनिंगचा कोर्स करण्याची इच्छा असल्यामुळे त्यांनी शिक्षण झाल्यानंतर आज करू उद्या करू म्हणून ते तसेच राहून गेले पुढे लग्नानंतर पुण्यातच राहण्याचा योग आला व त्यांनी आईजवळ एक इच्छा बोलून दाखवली की मला पुढे काहीतरी स्वतःच्या पायावर उभारण्यासाठी फॅशन डिझायनिंगचा कोर्स करण्याची इच्छा आहे .आई सुशीला यांनी त्यांना प्रोत्साहन दिले व सांगितले तो कोर्स कर काही असेल ती मदत मी करीन आणि दिपालीने एक वर्षाचा कोर्स पुणे येथे नवी पेठ या ठिकाणी करून पुढे हळूहळू दत्तवाडी या ठिकाणी आपल्या घरगुती टेलर व्यवसायाला सुरुवात केली व हळूहळू त्यातून मिळणारे पैशातून आपल्या कुटुंबाला हातभार सुरुवात केली. सुरुवातीला एका सिंगल पाट असलेल्या छोट्या मशीनवर कामाला सुरुवात केली हळूहळू त्या परिसरातील महिलांशी आपल्या जुन्या मैत्रिणींशी संवाद साधून अतिशय कमी दरामध्ये त्यांना फॅशन डिझायनिंग चे ब्लाउज शिवून देण्यास सुरुवात केली .

पुढे जाऊन गावाकडून एकदा त्यांच्या सासू जिजाबाई पुणे येथे घरी आल्यानंतर सासूबाईंनी सांगितलं एवढ्या छोट्या मशीनवर तू काम करत असून यातून कमी काम होत असून यात वेळही जास्त जात आहे. तुला मी मोठी मशीन घेऊन देण्यास मदत करते .तू मोठ्या ऑटोमॅटिक मशीन वर काम कर तुझं काम वाढेल दोन पैसे तुला यातून जास्त मिळतील व सासूबाईंनी त्यांना पुढे मोठी आटोमॅटिक मशीन घेऊन दिली. आज त्या मशीन वरती वेगाने काम करत असून दिवसभरामध्ये स्वतःच घर व मुलांचे सर्व कामे सांभाळून त्या आज सिंहगड रोड नऱ्हे या ठिकाणी मानाजी नगर येथे परफेक्ट लेडीज टेलर या नावाने सुसज्ज भागात काम करत आहेत. महिलांची संवाद साधून त्या चांगल्या प्रमाणात मशीनवर काम करत असून त्याच्या कुटुंबाला या व्यवसायातून हातभार लागत आहे .कोणतेही काम करण्याची इच्छा असली तरी त्याला कुटुंबाची साथ महत्त्वाची असते तीच त्यांना मिळाली त्याचा त्यांनी फायदा करून घेतला वर्षातून दोन-तीन महिलांचे असणाऱ्या सणावाराला जास्त प्रमाणात काम करून त्यातून आपल्या उत्पन्न मिळवत आहेत

आपल्या कुटुंबाचा गाडा सांभाळत आहेत. आज अनेक मुली मोठ्या प्रमाणात शिक्षण घेऊन नोकरीसाठी इकडे तिकडे धावत आहेत. दिपाली यांनी बारावीपर्यंत शिक्षण करून नोकरीच्या मागे न लागता आपले घर सांभाळून घरगुती व्यवसायातून मिळणाऱ्या उत्पन्नातून आपल्या कुटुंबाला हातभार लावून महिलांपुढे एक संदेश देण्याचे काम केलं आहे. त्यांच्या या व्यवसायाला हार्दिक हार्दिक व इतर महिलांनी यातून बोध घेऊन आपणही स्वतः काहीतरी करून स्वतःच्या पायावर उभे राहावे ही भावना त्यांनी व्यक्त केल्या.

सध्याच्या महागाईच्या युगामध्ये कुटुंबाला आपणही हातभार लावल्याशिवाय पर्याय नाही असं त्यांना वाटतं. जागतिक महिला दिनाच्या निमित्त सर्व महिला भगिनींना हार्दिक शुभेच्छा.




## पुणे कॉमिक कॉन २०२५ने चाहत्यांना दिल्या अविस्मरणीय आठवणी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

क्रंची रोलच्या सौजन्याने आयोजित मारुती सुझुकी अरीना पुणे कॉमिक कॉन २०२५ ने पुणेकरांना या वर्षातील सर्वोत्तम ब्लॉकबस्टर वीकेंडची पर्वणी दिली आहे. अविस्मरणीय आठवणींसह हा कार्यक्रम संपूर्ण शहराला पॉप कल्चरच्या भव्य उत्सवात न्हाऊन काढणारा ठरला. पुण्यासह विविध भागांतून आलेल्या चाहत्यांना या दोन दिवसीय उत्सवाने नॉन-स्टॉप मनोरंजनासह, खास चाहत्यांशी संवाद साधण्यासाठी आणि इंडस्ट्रीतील नामांकित ब्रँड्सच्या आकर्षक अनुभवांसाठी एकत्र आणले. दोन दिवसांत २२,००० हून अधिक लोकांनी या उत्सवाला भेट दिली आणि १५०० पेक्षा जास्त लोकांनी कोस्प्ले मध्ये सहभाग घेतला ज्यामुळे हा एक नेत्रसुखद आणि उत्साही अनुभव ठरला.

# अन्नपूर्णा परिवाराने साजरा केला महिला दिन

**कर्वेनगर (दै. आरंभ पर्व)**



अन्नपूर्णा परिवारातर्फे महिला दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला अन्नपूर्णा परिवाराचे वस्तीप्रतिनिधी व विश्वस्त मंडळ अतिशय उत्साहाने सहभागी झाले होते.

गरीब महिलांचे व त्यांच्या कुटुंबांचे आर्थिक सेवा देऊन सबलीकरण करणे व त्यांना आर्थिक, आरोग्यविषयक व सर्वांगीण विकासासाठी सहाय्य करणे हे अन्नपूर्णा परिवाराचे उद्दिष्ट आहे.

या कार्यक्रमात अन्नपूर्णाच्या संस्थापक अध्यक्ष डॉ. मेधा पुरव-सामंत यांनी सांगितले की या वर्षी अन्नपूर्णातर्फे त्यांच्या सभासदांना पेन्शन देण्याला प्राधान्य देण्यात येणार आहे, ज्यामुळे त्यांना त्यांच्या वृद्धापकाळात कोणावरही अवलंबून राहावे लागणार नाही. याच प्रसंगी जुन्या सभासद शेवंताबाई खुडे, लिलाबाई ढोक, सुशीला साळेकर, जहिदाबी जलालदीन यांना प्रत्येकी ११ लाख च्या फिक्स डिपॉझिट देण्यात आल्या. त्यावरील दरमहा व्याज त्यांच्या खात्यात जमा होईल व त्यांचे वृद्धत्व सुरक्षित राहील हेही मेधाताईंनी सांगितले.

या कार्यक्रमात अन्नपूर्णा परिवाराचे त्रैमासिक "संवाद"चे प्रकाशन करण्यात आले. यंदाचे वर्ष हे आंतरराष्ट्रीय महिला वर्षाचे 50 वे वर्ष आहे.

त्यामुळे विविध ठिकाणी महिला चळवळींनी काय कार्य केले आहे, याची समग्र मांडणी विविध लेखकांनी संवादच्या अंकामध्ये केली आहे. यामध्ये अन्नपूर्णा परिवाराचे आर्थिक सक्षमीकरणाचे कार्य गेली साडेतीन दशके सुरू आहे याबद्दल प्राची बापट यांनी लेख लिहिला आहे. तसेच मिळून साऱ्याजणी या चळवळीबद्दल गीताली वि. म. यांची मुलाखत दिलेली आहे. स्त्रीमुक्ती संघटनेबद्दल अरुणा बुरटे यांनी विशेष लेख लिहिला आहे.

तसेच समग्र जागतिक महिला चळवळीबद्दल माननीय छाया दातार यांनी लेख लिहिला आहे. शिवाय स्त्रीमुक्तीच्या कविता, असा विविध रंगी अंक प्रकाशित करण्यात आला. त्यासाठी अन्नपूर्णाचे सर्व विश्वस्त मंडळ व संपादक मंडळाच्या प्रतिनिधी वृषाली मगदूम हजर होत्या. सर्वांनी एकतेची शपथ घेऊन या कार्यक्रमाचा शेवट झाला.

# थोडक्यात



## सारथी फाउंडेशनकडून महिलांचा सन्मान

**पुणे (आरंभ पर्व) : सारथी फाउंडेशन, पुणे तर्फे महिला दिनानिमित्त महिलांचा सन्मान करण्यात आला. अध्यक्ष .श्री. दीपक चौघुले यांनी जागतिक महिला दिनानिमित्त कचरा डेपोमध्ये कार्यरत महिलांसोबत महिला दिन साजरा केला.तसेच त्यांना शुभेच्छा दिल्या. समाजासाठी अविरत मेहनत करणाऱ्या या कष्टकरी महिलांचा सन्मान करून, त्यांच्या योगदानाला कृतज्ञतेची भावना ह्यानिमित सारथी फाउंडेशनने अर्पण केली.**

## आपल्या त्वचेला द्या सर्वोत्तम देखभालीची भेट




**पुणे (आरंभ पर्व) : आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणजे केवळ एक सोहळा नाही – तर महिला दर दिवशी पार पाडत असलेल्या असंख्य भूमिकांना दिलेली ती एक मानवंदना आहे. त्याचबरोबर हा दिवस तुम्हाला थोडं थांबण्याची, मनावरचं ओझं थोडावेळ बाजूला ठेवण्याची आणि स्वत:ला प्राधान्य देण्याची आठवण करून देतो. आणि हे करण्यासाठी पोषण देणाऱ्या, नवी ऊर्जा पुरविणाऱ्या आणि तुमचा आत्मविश्वास वाढविणाऱ्या स्किनकेअरच्या नित्यक्रमाहून अधिक चांगला मार्ग तो कोणता? अखेर, कांतीमान त्वचा फक्त सुंदर दिसण्यापुरती महत्त्वाची नाही – तर आपण सक्षम असल्याची भावना आतून जाणविण्याशी तिचा संबंध आहे. आपली त्वचा तरुण, निरोगी आणि सुपोषित हावी हे प्रत्येक स्त्रीचे स्वप्न असते. पण कालपरत्वे, जीवनशैलीच्या निवडींचा आणि पर्यावरणीय ताणतणावांचा परिणाम त्वचेला सोसावा लागत असल्याने तुमच्या त्वचेला अधिकच्या देखभालीची गरज भासते. काळे डाग, सुरकुत्या, मुरुमं, स्ट्रेच मार्क्स तसेच कोरडी त्वचा यांसारख्या समस्यांपासून तिचे संरक्षण करणे – व ती तेजस्वी व लवचिक रहावी याची काळजी घेणे अत्यावश्यक आहे.**

## आयसीआयसीआय प्रु गिफ्ट सिलेक्ट; निश्चित उत्पन्न देणारा नवीन प्लॅन

**मुंबई (आरंभ पर्व) : आयसीआयसीआय प्रुडेंशियल लाइफ इन्शुरन्स ने आयसीआयसीआय प्रु गिफ्ट सिलेक्ट हा नवा दीर्घकालीन बचत प्लॅन सादर केला आहे, जो ग्राहकांना निश्चित उत्पन्नाची खात्री देतो आणि त्यांना गरजेच्या वेळी पैसे काढण्याची सुविधा देतो. या प्लॅनमध्ये ग्राहकांना अनेक लवचिक पर्याय उपलब्ध आहेत. निश्चित उत्पन्न कधी सुरू करायचे, निश्चित उत्पन्नाचा कालावधी, परिपक्वतेच्या म्हणजेच प्लॅनच्या मॅच्युरिटीवेळी ठराविक रक्कम मिळविण्याचे स्वातंत्र्य या प्लॅनमध्ये आहे. याशिवाय, यामध्ये जीवन विमा देखील आहे, जो कुटुंबासाठी आर्थिक सुरक्षा प्रदान करतो. या प्लॅनची खासियत म्हणजे वाढत्या उत्पन्नाचा पर्याय, ज्यात उत्पन्न दरवर्षी ५% चक्रवाढ दराने वाढते. यामुळे महागाईच्या काळात देखील आर्थिक व्यवस्थापन करण्यास मदत होईल. आयसीआयसीआय प्रुडेंशियल लाइफ इन्शुरन्सचे प्रमुख उत्पादन आणि वितरण अधिकारी श्री. अमित पालटा म्हणाले, “आमच्या नाविन्यपूर्ण उपक्रमांच्या परिपाठीनुसार आम्ही नेहमीच ग्राहकांसाठी त्यांच्या बदलत्या गरजांनुसार नवीन आणि उपयोगी योजना आणत असतो. आयसीआयसीआय प्रु गिफ्ट सिलेक्ट हा असाच एक प्लॅन आहे, जो ग्राहकांना त्यांच्या आर्थिक उद्दिष्टांनुसार आणि रोख प्रवाहाच्या गरजांनुसार निश्चित उत्पन्नाची हमी देतो." मागील काही महिन्यांपासून आपण बाजारात अस्थिरता अनुभवली आहे. अशा अस्थिर स्थितीमध्ये, ग्राहक निश्चित परतावा आणि सुरक्षित गुंतवणुकीला प्राधान्य देतात. हा प्लॅन ग्राहकांना बाजारातील चढ-उतारांपासून बचाव करत त्यांचे आर्थिक उद्दिष्ट साध्य करण्यास मदत करेल. या प्लॅनमधील वाढत्या उत्पन्नाच्या वैशिष्ट्यामुळे ग्राहकांना महागाईची चिंता न करता अधिक दीर्घकालीन आर्थिक नियोजन करता येईल. आमच्या ग्राहकांना दिलेले वचन पाळण्याची आम्ही पूर्ण बांधिलकी घेतलेली आहे. याचेच उदाहरण म्हणजे वित्तीय वर्ष २०२५ च्या पहिल्या ९ महिन्यांत आमचा क्लेम सेटलमेंट रेट ९९.३% इतका राहिला आहे, म्हणजेच जवळपास सर्व विमा दावे यशस्वीपणे निकाली काढले गेले. तसेच, ज्या प्रकरणांमध्ये चौकशीची आवश्यकता नव्हती, त्यामध्ये सरासरी फक्त १.२ दिवसांत क्लेमचे पेमेंट करण्यात आले, ज्यामुळे ग्राहकांना वेगवान आणि सुलभ सेवा मिळू शकली.**

## थोडक्यात



### डानफॉस पावर सोल्युशनचे पुण्यातील नव्या आवाराचे उद्घाटन

पुणे (आरंभ पर्व) : डानफॉस पावर सोल्युशन्स, जगातील मोबाईल आणि इंडस्ट्रीयल हायड्रॉलिक्स तसेच इलेक्ट्रिक पावरट्रेन प्रणालीची अग्रगण्य पुरवठेदार कंपनी असून, आज त्यांनी पुण्यातील तळेगाव येथे सात एकरात स्थित आपल्या नवीन ग्रीनफिल्ड युनिटची सुरवात केली, ज्यामुळे भारतातील त्यांच्या विस्तारामध्ये आणखीन एक महत्वाचे पाऊल उचलले गेले आहे. १,०००कोटी युरो पेक्षा अधिक असलेल्या या धोरणात्मक गुंतवणूकीमुळे डानफॉस पावर सोल्युशन्स भारतातील आपल्या उत्पादन क्षेत्रातील गुंतवणूकीला अधिक मजबूत बनवत, शाश्वत लक्ष्य साधण्याचा कंपनीचा धोरणाची पुर्तता करेल. डानफॉस समूहाने स्थिर गतीने आपले उत्पादन संशोधन आणि विकास क्षमता भारतात वाढविल्या असून देशाचा औद्योगिक विकासामध्ये एक महत्वाची भूमिका बजावली आहे. डानफॉस चे तळेगाव येथील आवार हे भारतातील सातवे उत्पादन केंद्र असून, यामुळे कंपनीचा स्थानिक गुंतवणूकींचा अंदाज येऊ शकतो. याशिवाय डानफॉस चा उत्पादन सुविधा पुण्यात इतर दोन ठिकाणी, चेन्नई, मुंबई, वडोदरा, बेंगलूरूमध्ये देखील आहेत.



### दहा मोबाईल केले उरूळी कांचन पोलिसांची परत

लोणी काळभोर (आरंभ पर्व) : उरूळी कांचन पोलिसांची परिसरातील गहाळ झालेले १० मोबाईलचा तांत्रिक पद्धतीने शोध घेऊन एकूण १ लाख ८० हजार रुपयांचे मोबाईल उरूळी कांचन पोलिसांनी हस्तगत करुन ते मोबाईल उपविभागीय पोलिस अधीक्षक बापुराव दडस यांच्या हस्ते मूळ मालकांना देण्यात आले. दशरथ नितिन खोले (रा. बोरीएंदी ता. दौंड), दिपु उमेश बिश्व (रा. कोरेगाव मुळ), मोहम्मद फजल शेख (रा. उरूळी कांचन, ता. हवेली), केशव विश्वंभर भारती (रा. कोरेगाव मुळ ता. हवेली), गौरी संजय ताकवणे (रा. पारगाव ता.दौंड), नरेशकुमार फेकु शर्मा (रा. कोरेगाव मुळ ता. हवेली), प्रशांत भरत गजरे (रा. तुपे वस्ती, उरूळी कांचन, ता. हवेली), दत्तात्रय संग्राम मुंढे (रा. उरूळी कांचन ता. हवेली), अफरिन शब्बीर जमादार (रा. खेडेकरमळा उरुळी कांचन ता. हवेली), अमोल लक्ष्मण शिंगाडे (रा. वाघापुर, ता. हवेली) यांचे गहाळ झालेले मोबाईल फोनचा शोध घेवुन त्यांना परत केल्याने उरुळी कांचन पोलिसांनी केलेल्या कामगिरीवर नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. सदरची कामगिरी दौंड विभाग उपविभागीय पोलीस अधीक्षक बापुराव दडस यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शंकर पाटील, पोलिस कर्मचारी अमोल खांडेकर, धनंजय भोसले, कुमार भिसे यांच्या पथकाने केली आहे.

### राजगुरूनगर नगरपरिषदेच्या भरमसाठ करवाढी विरोधात उपोषण

राजगुरुनगर-किरण खुडे (आरंभ पर्व) : राजगुरुनगर येथील राजगुरूनगर नगरपरिषदेने चालू आर्थिक वर्षात भरमसाठ करवाढ केली आली असून ही करवाढ चुकीची व अन्यायकारक आणि लूट करणारी आहे. या करवाढीला स्थगिती द्यावी. यासाठी सामाजिक कार्यकर्ते ॲड दिपक थिगळे हे सोमवार (दि.१०) पासून खेड पंचायत समिती आवारातील महात्मा फुले यांच्या पुतळ्याशेजारी बेमुदत उपोषणास बसले आहे. त्यांच्या या उपोषणाला शहरातील नागरिकांचा वाढता पाठिंबा मिळत आहे. करवाढीच्या नावाखाली संपूर्ण राजगुरूनगर मधील १७ हजार मिळकत धारक नागरिकांची लूट होत असून चुकीच्या पद्धतीने नगरपरिषदेकडून वसुली होत आहे. सर्वसामान्य नागरिकांचे नगरपरिषद प्रशासन ऐकून घेत नाही. अधिकारी कर्मचारी माहिती समजून सांगत नाहीत. नव्याने अस्तित्वात आलेल्या राजगुरूनगर नगरपरिषदेकडून नागरिकांना मुबलक स्वच्छ पाणी मिळत नाही. कचऱ्याचा प्रश्न गंभीर आहे.

# कुटुंब व्यवस्था आणि मानसिक आरोग्य जपणे महत्वाचे

## मा. राजेश पांडे : स्नेह ज्योती मानसिक आरोग्य मार्गदर्शन केंद्राच्या माध्यमातून मोफत समुपदेशन उपलब्ध - सौ. मंजुश्री खर्डेकर

**कर्वेनगर (दै. आरंभ पर्व)**

स्नेहालय विश्वस्त संस्था आणि नगरसेविका मंजुश्री खर्डेकर यांच्या संयुक्त विद्यमाने सुरु करण्यात आलेले "मोफत मार्गदर्शन केंद्र" हे अगदी योग्य वेळी सुरु करण्यात आले आहे, सध्या समाजात खूप अस्वस्थता आहे आणि अश्या वेळी कुटुंब व्यवस्था आणि मानसिक आरोग्य जपणे हे खूप महत्वाचे आहे असे भाजपा चे प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे म्हणाले. आज त्यांच्या हस्ते जागतिक महिला दिन आणि सौ. मंजुश्री खर्डेकर यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने सर्वसामान्य नागरिकांसाठी मोफत मानसिक आरोग्यासंबंधी मार्गदर्शन, वैयक्तिक व कुटुंब समुपदेशन,विवाहपूर्व व विवाहोत्तर समुपदेशन,व्यसनमुक्ती,रस्त्यावरील स्क्रीझोफ्रेनिक मनोरुग्ण व्यक्तींसाठी मार्गदर्शन अश्या सर्व प्रकारच्या समुपदेशनासाठी च्या केंद्राचे उदघाट्न करण्यात आले





त्यावेळी ते बोलत होते. दर गुरुवारी सकाळी 11 ते 4 कर्वेनगर येथील रमांबिका मंदिराजवळील शक्ती 98 चौकातील "दिव्यांग आधार केंद्र" येथे सौ. ज्योती एकबोटे ह्या मोफत मार्गदर्शन व समुपदेशन करणार असल्याचे मंजुश्री खर्डेकर यांनी सांगितले.नागरिकांना अनेक समस्या भेडसावत आहेत, त्यांना आपल्या भावना कुठे व्यक्त कराव्यात हे समजत नाही, त्यांच्या मानसिक कोंडमाऱ्यावर ह्या केंद्रात नक्कीच उपाय सापडेल असा विश्वास देखील सौ. मंजुश्री खर्डेकर यांनी व्यक्त केला.

याठिकाणी समुपदेशनासाठी येणाऱ्या सर्वांची माहिती गुप्त राखण्यात येते व त्यांना योग्य मार्गदर्शन करून त्यांच्या समस्या सोडविल्या जातात असे ह्या केंद्राच्या संचालिका सौ. ज्योती एकबोटे यांनी स्पष्ट केले. यावेळी भाजपा चे प्रदेश प्रवक्ते संदीप खर्डेकर,नगरसेवक जयंत भावे,प्रभाग अध्यक्ष एड. प्राची बगाटे,सौ.श्रीजा ठाकूर,गौरीताई करंजकर,सौ. कल्याणी खर्डेकर, डॉ. हिमांशू परांजपे, डॉ. कांचन परांजपे इ मान्यवर उपस्थित होते. यावेळी उपस्थित महिलांना डॉ.कांचन परांजपे यांनी तयार केलेली ऑरगॅनिक सौंदर्य प्रसाधने भेट देण्यात आली.

# एमआयटी एडीटी विद्यापीठात पर्सोना महोत्सवास सुरुवात

**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टेक्नोलॉजी विद्यापीठ, लोणी-काळभोर, पुणे, आपल्या बहुप्रतिक्षित वार्षिक टेक्नो-कल्चरल फेस्टिव्हल 'पर्सोना फेस्ट २०२५साठी सज्ज झाली आहे. हा भव्य उत्सव११ ते १३मार्च २०२५ दरम्यान आयोजित केला जाणार आहे आणि त्यात संपूर्ण भारतातील १२५ हून अधिक महाविद्यालये आणि विद्यापीठांमधील १७,००० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांच्या सहभागाची अपेक्षा आहे. या महोत्सवाचे उद्घाटन प्रतिष्ठित मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे, ज्यामध्ये कांची विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एन. जयशंकरण आणि पद्मश्री डॉ. जब्बार पटेल, सुप्रसिद्ध दिग्दर्शक सहभागी असतील. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माईर्स शिक्षण समूहाचे संस्थापक प्रो. डॉ. विश्वनाथ कराड भूषवतील. तसेच, एमआयटी एडीटी विद्यापीठाचे




कार्यकारी अध्यक्ष प्रो. डॉ. मंगेश कराड, कार्यकारी संचालक डॉ. सुनीता कराड, आणि विद्यापीठाचे कुलगुरू प्रो. डॉ. राजेश एस. हेही या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. या चार दिवसीय महोत्सवात देशभरातील नामवंत गायक आणि कलाकार आपली कला सादर करतील, ज्यामध्ये लोकप्रिय अभिनेता आरोह वेलणकर हे प्रमुख आकर्षण असतील. पर्सोना फेस्ट आपल्या बहुआयामी कार्यक्रमांसाठी प्रसिद्ध आहे. यावर्षीच्या महोत्सवाचे प्रमुख आकर्षण लाईव्ह म्युझिक परफॉर्मन्स: -नामांकित गायक आणि बँड प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करतील.

# मनपा नऱ्हे शाळेमध्ये जागतिक महिला दिन साजरा

**लक्ष्मण साबळे**

## नऱ्हे मनपा शाळेच्या प्रगतीबाबत सर्व मान्यवरांकडून कौतुक

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिकेच्या नऱ्हे प्राथमिक शाळेमध्ये महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

महिला दिनाचे औचित्य साधून शाळेच्या विकासात भरीव योगदान देणाऱ्या महिला शिक्षकांचा येथोचित सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.तसेच सामाजिक क्षेत्रातील कर्तुत्ववान महिलांचाही सत्कार घेण्यात आला.

महिला दिनानिमित्त सर्व महिला शिक्षकांचे गंमतीशीर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यामध्ये लिंबू चमचा,एक मिनिटात गहू मोजणे,बकेटमध्ये बॉल टाकणे, चेंडू पास करणे, बिस्कीट खाणे असे गंमतीशीर खेळ घेऊन विजेत्या महिलांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिस देण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांनी महिला दिनानिमित्त भाषण,गीत गायन, नृत्य सादरीकरण केले.



सदर कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून शैलेजा जानकर, सहायक पोलीस निरीक्षक यांनी संवाद साधताना विद्यार्थ्यांना संरक्षणाचे धडे दिले.आई-वडील व शिक्षक यांना मित्र मानून आपल्या बाबत घडणाऱ्या कुठल्याही नकारात्मक गोष्टीबाबत संवाद साधण्याबाबत मार्गदर्शन केले.तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षा पर्यवेक्षक नंदा डोळस यांनी कर्तुत्वान महिलांचा इतिहास सांगताना जागतिक महिला दिनाचे महत्त्व विशद केले.

प्रमुख पाहुणे म्हणून माजी सभापती प्रभावतीताई भुमकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

महिलांनी स्वतःच्या पायावर स्वावलंबी होऊन आपले नावलौकिक वाढवावे असे मत त्यांनी मांडले.


सर्व महिला शिक्षिकांचा सत्कार सहायक पोलीस निरीक्षक शैलेजा जानकर, प्रभावती भूमकर, सुप्रियाताई भूमकर, विजय गुरव,छबूराव वाडेकर, एकनाथ भूमकर, प्रभारी मुख्याध्यापक अंकुश माने यांच्या हस्ते सन्मानचिन्ह गुलाबपुष्प देऊन करण्यात आला.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनायक साखरे,संघरत्न लोणे यांनी केले तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक नितीन इंगळे व आभार सतीश मस्के यांनी व्यक्त केले. महिलांसाठी स्पर्धांचे नियोजन श्रीकांत जंगम व सुनील कटके यांनी केले.

# रेमो डिसोझा आणि मलायका अरोरा परीक्षकांच्या भूमिकांसाठी सज्ज

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

भारतातील पहिला आणि एकमेव हिप-हॉप आधारित डान्स रिॲलिटी शो, हिप हॉप इंडिया, ॲमेझॉनची विनामूल्य व्हिडिओ स्ट्रीमिंग सेवा, ॲमेझॉन एमएक्स प्लेयरवर मोठ्या, दुसऱ्या सीझनसाठी परतत असल्याने तुमचे सर्वोत्तम पाऊल पुढे टाकण्याची वेळ आली आहे. आपल्या पदार्पणाच्या सीझनच्या भरघोस यशानंतर, दुसऱ्या सीझनचा उद्देश हिप-हॉप नृत्य प्रकार साजरा करणे, लक्षवेधी कामगिरी, नृत्याची आकर्षक स्पर्धा, भारतात फारसा चर्चेत नसलेल्या हिप-हॉप जगात खोलवर शिरणे आणि प्रेक्षकांसाठी संपूर्ण नवीन प्रकारचे मनोरंजन दाखल करण्याचा




आहे. आज या स्ट्रीमिंग सेवेने हृदयस्पर्शी ट्रेलरचे अनावरण केले. ज्यामुळे प्रेक्षकांना थक्क करणारी प्रतिभा आणि या सीझनची व्याख्या नव्याने रचणाऱ्या नव्या दमाच्या कलाकारांची ओळख झाली. प्रसिद्ध नृत्यदिग्दर्शक-दिग्दर्शक रेमो डिसोझा आणि आश्चर्यकारक मलायका अरोरा यांच्या पारख्या नजरेतून उत्कृष्ट प्रतिभा निवडल्या जातील. हिप हॉप इंडिया सीझन 2 दिनांक 14 मार्चपासून विनामूल्य, केवळ ॲमेझॉन एमएक्स प्लेयरवर प्रसारित होईल. आगामी हाय-स्टेक स्पर्धेची झलक दाखवणारा हा ट्रेलर अनपेक्षित वळणं, भावनिक प्रवास आणि इतरांसारख्या हिप-हॉप संस्कृतीच्या उत्सवाने भरलेल्या सीझनचा मूड सजणार आहे. रेमो डिसोझाच्या तीक्ष्ण तांत्रिक कौशल्याने आणि मलायका अरोराच्या अतुलनीय तेजाने, देशातील सर्वोत्तम नर्तक अंतीम विजयाचा मुकुट पटकविण्याकरिता प्रयत्नांची शर्थ करतील. त्यामुळे दुसरा सीझन पूर्वीपेक्षा अधिकच रंगतदार होईल. या सीझनचे सूत्रसंचालन निराळाच करिश्मा लाभलेली जोडी मनीषा राणी आणि विकेड सनी करत आहेत. त्यामुळे प्रेक्षकांना सिग्नेचर स्टाइल आणि स्वॅग यांचं मिश्रण पाहता येईल.

आपल्या मनातील भावनेचा पुनरुच्चार करताना, ॲमेझॉन एमएक्स प्लेयरचे कंटेंट हेड अमोघ दुसाद म्हणाले, “हिप हॉप इंडिया भारतातील हिप-हॉप संस्कृतीसाठी एक परिपूर्ण गेम-चेंजर आहे. या सीझनमध्ये, आम्ही अगदी खोलवर शिरलो आहोत. हिप-हॉपचा ध्यास असणारे आणि नृत्याचा श्वास घेणाऱ्या नर्तकांना पुढे आणत आहोत. हाय-व्होल्टेज कामगिरी, प्रेरणादायी कथा आणि अशा स्पर्धेची अपेक्षा; जी मंचावर स्वतःचे अस्तित्व पुन्हा परिभाषित करेल.”

परीक्षक म्हणून परतून येण्याबद्दल बोलताना, रेमो डिसोझा म्हणाला, "हिप-हॉप नृत्याच्या पलीकडे आहे. त्यात कच्चेपण, वास्तविकता आणि बंडखोरपणा आहे. सीझन 1 चांगला चालला. मात्र सीझन 2 पूर्णपणे वेगळ्या स्तरावर नेईल हा विश्वास ठेवा.

मी परीक्षक म्हणून पुनरागमन करण्यासाठी आणि भारताच्या सर्वोत्तम प्रतिभेला खेळात पुढे जाताना पाहण्यासाठी उत्सुक आहे. मंचावर आपली मालकी सिद्ध करण्यास सज्ज असलेल्या नर्तकांची नवीन लाट पाहण्यासाठी मी आणखी प्रतीक्षा करू शकत नाही.”

या कार्यक्रमाचा भाग होण्याची संधी मिळाल्याबद्दल उत्सुकतेने बोलताना मलायका अरोरा म्हणाली, “हिप-हॉप हा निर्भय, धाडसी आणि सतत प्रगत होणारा नृत्य-प्रकार आहे.

# मुंबईत ३ ते ५ एप्रिलदरम्यान 'एलईडी एक्स्पो'

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

स्वयंचलन, संक्रमणीय, बुद्धिमत्ता आणि उर्जा कार्यक्षमता आदी सुविधांच्या संयोजनासह रोषणाई/लाईट उद्योग सध्या विविध नवकल्पनांसह उदयास येत आहे. 'मेस्से फ्रँकफर्ट ट्रेड फेअर्स इंडिया'द्वारे आयोजित 'एलईडी एक्स्पो मुंबई' हे भारतातील एकमेव समर्पित व्यासपीठ आहे, ज्यामध्ये रोषणाईशी संबंधित सर्व गोष्टींचा समावेश आहे. मेस्से फ्रँकफर्ट ट्रेड फेअर इंडियातर्फे मुंबईतील बॉम्बे एक्झिबिशन सेंटर येथे येत्या ३ ते ५ एप्रिल २०२५ या कालावधीत आयोजित केलेल्या एलईडी एक्स्पोमध्ये २०० हून अधिक प्रदर्शकांच्या ६ हजारहून अधिक उत्पादनांची पर्वणी मिळणार आहे.

'एलईडी एक्स्पो मुंबई'मध्ये एलईडी रोषणाईच्या विविध प्रकार/उपायांचे एक अनोखे मिश्रण प्रदर्शित केले जाईल. हे अनोखे मिश्रण केवळ रोषणाई उद्योगातच नाही तर स्मार्ट लाईट्स, डिझाइन आणि सजावटीसाठी एलईडी, वातावरणीय रोषणाई एलईडी आणि प्रकाश उपयोजनांमध्ये बायोमिमिक्रीसारख्या समस्या सोडवणाऱ्या नवीन संकल्पनांना प्राधान्याने अधोरेखित करते. आगामी आवृत्तीत २० पेक्षा अधिक प्रदर्शकांसह विद्युतविषयक खंडांमध्ये वाढ होणार आहे.

आगामी एलईडी एक्स्पोमध्ये सहभागी झालेल्यांबरोबर केलेल्या प्रदर्शक सर्वेक्षणातून उद्योगातील महत्त्वाचे ठळक मुद्दे समोर आले, ज्यामधून खालील गोष्टी अधोरेखित झाल्या :



- वास्तुशास्त्रीय प्रकल्प आणि व्यावसायिक इमारतींमध्ये स्मार्ट लाइटिंग आणि स्वयंचलित उत्पादनांचा वापर मोठ्या प्रमाणात दिसून आला. परंतु टियर-२ आणि टियर-३ शहरांमध्ये ही परिस्थिती बदलते. अशाप्रकारच्या दोन्ही शहरांमध्ये या उत्पादनांचा वापर अत्यंत संथगतीने होतो. यामध्ये पुरवठा साखळी, वीजपुरवठा खंडित होणे आदी सामान्य अडथळे ही उत्पादने मोठ्या प्रमाणात स्वीकारण्यास आव्हान देत आहेत.

- प्रदर्शकांनी असेही निदर्शनास आणले की अनेक घटक आंतरराष्ट्रीय स्तरावरून प्राप्त केले जातात.

- एलईडी लाइटिंगसारख्या उद्योगाला आत्मनिर्भर बनविण्यासाठी सरकारी योजनांचे स्थानिकीकरण आणि एलईडी उत्पादनांच्या उच्च दर्जाच्या उत्पादनाला प्रोत्साहन दिले जात आहे. स्मार्ट सिटी मोहीम आणि भारतातील घरांची वाढती मागणी यासारख्या महत्त्वाच्या उपक्रमांसह भारतातील एलईडी लाइटिंग उद्योगात सतत्याने वाढ नोंदविली जात आहे.

- ग्रामीण विद्युतीकरण कार्यक्रमांतर्गत, विशेषत: ईशान्य भारतामध्ये सौर-आधारित एलईडी दिवे बसवण्यातही ते सक्रिय आहेत.

भारतातील पायाभूत सुविधा क्षेत्रात उल्लेखनीय वाढ झाली आहे. त्यामुळे एलईडी लाइटिंग उद्योगासाठी नवनवीन मार्ग खुले झाले आहेत, असे 'मेस्से फ्रँकफर्ट एशिया होल्डिंग्ज लिमिटेड'चे कार्यकारी संचालक श्री. राज मानेक यांनी आपले विचार व्यक्त करताना सांगितले.

प्रकाशयोजनेव्यतिरिक्त, एलईडी तंत्रज्ञान सुशोभीकरण प्रकल्प, घरातील आणि बाहेरील सजावट, पथदिवे आणि सार्वजनिक ठिकाणांची प्रकाशयोजना यासारख्या इतर अनेक उपयोजनांमध्ये क्रांती घडवत आहे. एलईडी दिवे ऊर्जा कार्यक्षम असण्याबरोबरच ते अधिक तेजस्वी होत आहेत, ज्यामुळे उर्जेचा वापर कमी होत आहे. मला हे सांगण्यास आनंद होत आहे की 'एलईडी एक्स्पो मुंबई २०२५'मध्ये एलईडी आणि प्रकाश उद्योग पुन्हा एकदा एकत्र येऊन भारत ज्या दिशेने प्रगती करत आहे, त्या भविष्यासाठी नवकल्पना सादर करण्यात येईल. गेल्या काही वर्षांमध्ये आम्ही इकोसिस्टमला आणखी मजबूत करत इलेक्ट्रिकल विभागातील सहभागामध्ये लक्षणीय वाढ पाहिली आहे.

एक्स्पो दरम्यान, क्युरेटेड नॉलेज सत्रांमध्ये उद्योग तज्ज्ञ व्यासपीठावर येऊन या क्षेत्रातील त्यांचे अनुभव, अंतर्दृष्टी कथन करतील.



# प्रादेशीक परिवहन कार्यालयाच्या नाकर्तेपणामुळे टाकाऊ वाहनांचा ढीग

**किरण खुडे**

## तर पोलीस मदत केंद्र कायम कुलूपबंद

**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)**

पुणे शहरातील स्वारगेट एसटी बसस्थानकात उभ्या असलेल्या बसमध्ये एका तरुणीवर अत्याचार करण्यात आल्याच्या संतापजनक घटनेनंतर सर्वच बसस्थानके, एसटी आगारे, पिकअप स्थानके येथील महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या घटनेनंतर राजगुरुनगर मधील एसटी बसस्थानकाची पाहणी केली असता, या ठिकाणी महिलांची सुरक्षिततेसाठी व सेवेसाठी योग्य ती खबरदारी एसटी महामंडळ घेत असल्याचे चित्र पाहायला मिळाले. परंतु प्रादेशीक परिवहन कार्यालयाच्या नाकर्तेपणामुळे आगारात जप्त केलेल्या वाहनांचा ढीग साठला आहे तर पोलीसांच्या उदासिनतेमुळे योग्य असा बंदोबस्त फारसा मिळत नसल्याचे दिसून आले.

राजगुरुनगर हे तालुक्याचे ठिकाण असल्याने शाळा , महाविद्यालयात शिक्षण घेणारे विद्यार्थीनी - विद्यार्थी व कामानिमित्त एसटीने प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठी आहे. शाळा, महाविद्यालय सुटल्यानंतर गावोगावच्या गाड्यांच्या प्रतिक्षेत विद्यार्थी व प्रवाशांची मोठी गर्दी होते. गाड्याही वेळापत्रकानुसार सुटतात. परंतु या गर्दीच्या वेळी आवश्यक असणारे पोलीस कर्मचारी येथे अभावानेच दिसतात. खेड पोलीस स्टेशनला आवश्यक असणारे पोलीस बळ कमी असल्याने सहाय्यासाठी होमगार्ड कर्मचाऱ्यांची मदत घेतली जाते. परंतु ते बंदोबस्तापेक्षा मोबाईल खेळण्यात मग्न झालेले दिसतात. त्यामुळे प्रवाशांची विशेषतः महिलांची सुरक्षा रामभरोसे आहे. अनेकदा त्यामुळे प्रवाशांचे दागिणे, पैसे, मोबाईलचोरी अशा घटना होत आहेत.

येथील पोलीस मदत केंद्राला महामंडळाने स्थानक प्रमुखांच्या कार्यालयालगत जागा दिली आहे. परंतु गेल्या वर्षभरापासून हे मदत केंद्र उघडलेच नाही. असे प्रवाशांनी सांगितले. तर प्रादेशिक परिवहन विभागाने जप्त केलेल्या गाड्या वर्षानुवर्षे धुळ खात आगारात ढीगाने पडून आहेत. यामध्ये ट्रक, टेम्पो, जेसीबी मशीन, लोकनाट्य तमाशा कंपनीचे वाहन, स्कुल बस, खाजगी प्रवासी बस अशी सुमारे दोन डझन वाहने पडून आहेत. त्यामुळे महामंडळाच्या गाड्या लावण्यासाठी जागा अपुरी पडते. तसेच या बंद व सडलेल्या नादुरूस्त वाहनांमुळे लगतच्या कर्मचारी विश्रांतीगृहामध्ये रोगराई पसरु शकते. याबाबत प्रादेशिक परिवहन विभागाकडे एसटी प्रशासनाने वेळोवेळी पाठपुरावा करूनही त्यांनी याबाबत कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे समजते. तसेच या वाहनांमुळे आगारातील या भागाची साफसफाई ठेवता येत नाही.

महिला कर्मचाऱ्यांसाठी असणारे विश्रांतीगृह चांगले असून योग्य त्या सुविधा तेथे आहेत. तसेच महामंडळाच्या नियमानुसार महिला कर्मचाऱ्यांसाठी योग्य त्या सेवा पुरविल्या जातात. बसस्थानकावर हिरकणी कक्ष, स्वच्छतागृह, प्रकाश व्यवस्था, पिण्याचे थंड पाणी, पंखे व्यवस्थित असून स्थानकावर स्वच्छता नियमीत राखली जाते. साफसफाईचे कंत्राट खाजगी ठेकेदारांकडे असल्याने त्यांनी नेमलेल्या कर्मचाऱ्यांकडून नियमीत साफसफाई होते. तरीही साफसफाई कर्मचाऱ्यांची संख्या वाढविण्याची आवश्यकता आहे.

तसेच गेल्या काही महीन्यांपूर्वी राजगुरुनगर आगारात गॅस पंप सुरू झाला आहे. तेथे एसटीच्या वाहनांसह खाजगी वाहनांनाही गॅस भरण्याची सुविधा आहे. चोवीस तास सुरू असलेल्या या पंपावर मात्र कोणताही सुरक्षारक्षक नसल्याची माहिती सुत्रांकडून मिळाली. तेथे नियमीत सुरक्षारक्षकांची आवश्यकता आहे.



बसस्थानकात बसला प्रवेश करण्यासाठी व बस बाहेर पडण्यासाठी पुर्वी स्वतंत्र मार्ग होते. परंतु गेल्या काही वर्षापासून या मार्गाचे कोणीही पालन करत नसल्याचे दिसते. कोणतीही बस कोणत्याही गेटमधून आत येते व बाहेर जाते. त्यामुळे दोन्ही प्रवेशद्वारांपाशी काही वेळा वाहतुकीची कोंडी होते. हि प्रवेशद्वारे पुर्वीप्रमाणे एकेरी वापरली जावीत. अशी प्रवाशांची मागणी आहे. रात्री आठ वाजेपर्यंत बहुदा सर्व मुक्कामी गाड्या मार्गस्थ झालेल्या असतात. त्यानंतर इतर आगारांच्या पुणे, नाशिक, मुंबई, बडोदा, धुळे आदी जाणाऱ्या- येणाऱ्या गाड्या सुरु राहतात. दिवसाप्रमाणे रात्रपाळीसाठीही वाहतुक नियंत्रक, सुरक्षारक्षक अशा नियमीत कामगिऱ्या सुरु आहेत. परंतु गेल्या काही महिन्यांपासून सुरू झालेल्या बायपास रस्त्यामुळे जवळच्या व लांब पल्ल्याच्या गाड्यांमधील चालक वाहकांकडून राजगुरुनगरला उतरणाऱ्या प्रवाशांना बसमध्ये बसू दिले जात नसल्याच्या अनेक प्रवाशांच्या तक्रारी आहेत. पुण्याहुन नाशिककडे जाणाऱ्या व नाशिककडून पुण्याकडे जाणाऱ्या बसमध्ये चढताना आधीच 'राजगुरुनगरला उतरणाऱ्या प्रवाशांनी बसमध्ये बसू नये' गाडी बायपासने जाणार आहे, असे चालक वाहकांकडून सांगण्यात येते. तरीही बसल्यास अशा प्रवाशांना शहरापासून दोन किलोमीटर दुर अंतरावरील टोलनाक्यावर अथवा बायपासला उतरविले जाते.यात महिला प्रवाशांचाही सहभाग असतो. अशा वेळी महिला प्रवाशांबाबत गैरप्रकार होऊ शकतो. रात्री-अपरात्री हा प्रकार जोखमीचा असून वरीष्ठ कार्यालयाने अशा कर्मचाऱ्यांबाबत कारवाईची मागणी प्रवाशांनी केली आहे.

---

## पुण्यात होणार उद्योजकांचा पुरस्कार सोहळा




- KPM मीडिया तर्फे कार्यक्रमाचे आयोजन
- सिनेअभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांच्या हस्ते होणार उद्योजकांचा सन्मान
- २० एप्रिल रोजी उद्योजकांचा सन्मान, महाराष्ट्र उद्योग गौरव पुरस्कार २०२५चे नामांकने जाहीर!

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्र राज्यात उद्योजकता वाढीस लागावी याकरिता शासन अनेकदा विविध उपक्रम राबवत असते. या उपक्रमातून नवीन उद्योजक घडवणे, व्यवसाय उद्योग धंदे यांना चालना देणे नवीन उद्योग राज्यात आणणे तसेच नवीन स्टार्टअप योजनेच्या माध्यमातून नवीन उद्योजक यांचे विचार मांडणे यासारखे विविध उपक्रम शासन पातळीवर राबवले जात असतात.

अनेक उपक्रमाच्या माध्यमातून उद्योजकांचा सन्मान देखील केला जातो. राज्यात उद्योजकतेला प्रेरणा मिळावी या अनुषंगाने महाराष्ट्र उद्योग गौरव पुरस्कार २०२५चे आयोजन करण्यात येणार आहे.

या पुरस्काराच्या माध्यमातून उद्योजकांचा यथोचित गौरव सन्मान करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम २० एप्रिल रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आलेला आहे.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सिने अभिनेत्री सोनाली कुलकर्णी, माननीय दिपक (भाऊ) मानकर (मा. उपमहापौर, पुणे) हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहे.

या भव्य सोहळ्यात राज्यभरातील उद्योगपती, स्टार्टअप उद्योजक आणि व्यावसायिक एकत्र येणार असून, उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या कंपन्या आणि उद्योजकांचा सन्मान करण्यात येणार आहे.

दैनिक आरंभपर्व आरंभ एका नव्या पर्वाचा MEDIA PARTNER

या पुरस्काराचे एएनआय, बिझनेस स्टँडर्ड, लोकमत टाइम्स, दै. आरंभ पर्व, प्रिंट, रेड कार्पेट,हे या पुरस्कार सोहळ्याचे मीडिया पार्टनर आहेत.

हा भव्य कार्यक्रम तरुण उद्योजक यांच्या साक्षीने पार पडणार असून जास्तीत जास्त उद्योजकांनी या पुरस्कार सोहळ्याला उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

पुरस्कार सोहळ्यात सहभागी होण्यासाठी तथा अधिक माहितीसाठी संपर्क : ९३७०८१६३५४

---

# पुण्यात कलेच्या माध्यमातून मासिक पाळीच्या आरोग्याबाबत जनजागृती

## 'उजास' आणि पिंपरी-चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचा उपक्रम

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

'उजास' आणि पिंपरी-चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट व स्वयंसेवकांच्या सहकार्याने १६ ते २५ वयोगटातील सुमारे एक हजार तरूणींना मासिक पाळीचे आरोग्य आणि स्वच्छतेबाबत जनजागृती करणाऱ्या वॉल पेंटिंग उपक्रमात सहभागी करून घेण्यात आले. मासिक पाळीशी संबंधित मिथक आणि गैरसमजांना आव्हान देण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

'उजास' हा आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्टच्या अद्वैतेश बिर्ला यांच्या पुढाकाराने राबविण्यात येणारा उपक्रम आहे. पुण्याच्या आजूबाजूच्या ग्रामीण आणि निमशहरी भागात विविध क्षेत्रात प्रगती झाली असली तरी मासिक पाळीशी संबंधित गैरसमज प्रचलित आहेत. त्यामुळे मुलींमध्ये शाळेत गैरहजर राहण्याचे प्रमाण वाढत आहे. मासिक पाळीबाबतच्या आरोग्यविषयक जागरुकतेचा अभाव, कलंक आणि सॅनिटरी प्रॉडक्ट्सच्या




अपुऱ्या उपलब्धतेमुळे भारतात दरवर्षी सुमारे २३ दशलक्ष मुली शाळा सोडतात, असे संशोधनात आढळले आहे. विद्यार्थी आणि स्वयंसेवकांनी कॉलेजच्या बाहेरील भिंतींचे रूपांतर परिवर्तनासाठीच्या कॅनव्हासमध्ये करत मासिक पाळीबद्दलचे मौन भंग करण्यासाठी आणि खुल्या संभाषणांना वाव देण्यासाठी एक साधन म्हणून कलेचा वापर केला.

हा उपक्रम 'उजास'च्या संपूर्ण महाराष्ट्रात सुरू असलेल्या प्रयासांचा भाग आहे. यात जागरूकता कार्यक्रमांच्या माध्यमातून आणि मासिक पाळीबाबत अभावाशी सामना करण्यासाठी ४६,७१,९०० सॅनिटरी पॅडचे मोफत वाटप करून ती ४,३२,३२१ किशोरवयीन मुली, महिला आणि तरुण मुलांपर्यंत पोहोचली आहे. मासिक पाळीतील स्वच्छतेच्या उत्पादनांच्या अभावामुळे भारतातील पाचपैकी एका मुलीला तारुण्यानंतर शाळा सोडावी लागते, त्यामुळे शिक्षणातील स्त्री-पुरुष दरी आणखी वाढते. एकट्या पुण्यात 'उजास'ने १५,५९३ हून अधिक विद्यार्थिनींना प्रभावित केले आहे. चुकीची माहिती आणि सांस्कृतिक कलंक मासिक पाळीच्या आरोग्यविषयक संवादात अडथळे आणत असल्याने अशा प्रकारच्या हस्तक्षेपांची नितांत गरज अधोरेखित झाली आहे.

या उपक्रमाविषयी बोलताना उजास च्या संस्थापक अद्वैतेश बिर्ला म्हणाल्या,"मासिक पाळीबाबतच्या गैरसमज आणि निर्बंधांमुळे असंख्य मुली बंधनात पडतात व त्यामुळे त्यांची क्षमता आणि संधी मर्यादित होतात. हे चक्र मोडून काढण्यासाठी आपण उद्याचे चेंजमेकर असलेल्या तरुणांपासून सुरुवात केली पाहिजे. जेव्हा तरुण मने आजच्या कालबाह्य समजुतींना आव्हान देतील, तेव्हा भावी पिढ्या कलंकमुक्त होतील. कोणत्याही मुलीला तिच्या मासिक पाळीमुळे त्रास होणार नाही आणि अडथळ्यांशिवाय तिला तिच्या स्वप्नांचा पाठपुरावा करण्याचे स्वातंत्र्य असेल असा भारत हे माझे स्वप्न आहे. जागरूकता, मासिक पाळीशी संबंधित विनामूल्य उत्पादने उपलब्ध करून देणे आणि शाश्वतता या तीन स्तंभांवर 'उजास' उभी आहे.

'उजास'च्या प्रमुख पूनम पाटकर म्हणाल्या,"मासिक पाळीचे आरोग्य आणि स्वच्छता व्यवस्थापनाबाबत जनजागृती करण्यासाठी केलेल्या अथक सहकार्याबद्दल 'पिंपरी-चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट, प्राचार्या डॉ. स्मिता सूर्यवंशी आणि विद्यार्थिनींचे आम्ही मनापासून आभारी आहोत. मासिक पाळीचे आरोग्य ही केवळ वैयक्तिक समस्या नाही - हा सार्वजनिक आरोग्याचा गंभीर मुद्दा आहे. भारतातील जवळपास ७१ टक्के किशोरवयीन मुली मासिक पाळी येईपर्यंत मासिक पाळीबद्दल अनभिज्ञ राहतात. त्यामुळे अनेकदा त्यांची तयारी झालेली नसते, त्यांना लाज वाटते आणि सामाजिक गैरसमजांमुळे त्यांच्यावर निर्बंध येतात.

'उजास'मध्ये आम्ही खुल्या संवादांना चालना देण्यासाठी, मासिक पाळीशी संबंधित लज्जा आणि बंधनांचे चक्र तोडण्यासाठी आणि किशोरवयीन मुलींना आत्मविश्वासाने आणि स्वातंत्र्याने त्यांचे जीवन जगण्यास सक्षम करण्यासाठी कटिबद्ध आहोत. कोणत्याही मुलीची स्वप्ने कलंक किंवा चुकीच्या माहितीमुळे मागे पडू नयेत, यासाठी आम्ही अशा उपक्रमांच्या माध्यमातून एक पाऊल पुढे टाकतो.

मासिक पाळीच्या आरोग्याविषयी जागरूकता व्यापक प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्याची खात्री व्हावी यासाठी सर्जनशील अभिव्यक्तीचा वापर करणारा वॉल पेंटिंगचा कार्यक्रम हा या मिशनचा एक नैसर्गिक विस्तार आहे. तरुणांना प्रवक्ते म्हणून समाविष्ट करून घेऊन या उपक्रमाने हे सुनिश्चित केले आहे, की ही भित्तिचित्रे मासिक पाळी नैसर्गिक आहे आणि कोणालाही शिक्षण किंवा संधीपासून कधीही मागे ठेवू नये याची कायमस्वरूपी आठवण करून देतील. अशा उपक्रमांच्या माध्यमातून प्रभावी संवादांना चालना देणे, मासिक पाळीचे सामान्यीकरण करणे आणि पुढील पिढीला मासिक पाळीच्या कलंकापासून मुक्त भविष्य घडविण्यासाठी सक्षम बनविणे उजास सुरू ठेवत आहे.

---

## चहा प्रेमींसाठी मालपाणीज् बेकलाईटने लाँच केले मिल्क चाय टोस्ट आणि ब्राउन चाय टोस्ट

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतात चहाच्या वेळी होणाऱ्या अल्पोपाहाराला एक आधुनिक आणि आरोग्यदायक ट्विस्ट देत मालपाणीज् बेकलाईट ने नाविन्यपूर्ण चाय टोस्ट्स सादर केले आहेत. कंपनीच्या वतीने नुकतीच याबाबतीत अधिकृत घोषणा करण्यात आली.

स्वच्छता आणि पोषण यावर लक्ष केंद्रित करून चहाच्या वेळी अल्पोपाहार करण्याच्या पारंपारिक संकल्पनेला पुनरुज्जीवित करणे, तसेच आजच्या व्यस्त आणि आरोग्याबाबत जागरूक ग्राहकांसाठी चहाच्या वेळी उत्तम अनुभव देण्याचे कंपनीचे उद्दिष्ट आहे. मालपाणीज् बेकलाईट च्या २ टोस्ट असलेल्या सॅशेमुळे ही चिंता दूर होते. यामध्ये मिल्क चाय टोस्ट आणि ब्राउन चाय टोस्ट हे दोन प्रकार उपलब्ध आहेत. हे दोन्ही वैयक्तिकरित्या पॅक केलेले, स्वच्छ आणि उत्कृष्ट घटकांपासून बनवलेले असून चहाच्या वेळी वापरल्या जाणाऱ्या पारंपारिक स्नॅक ला एक आरोग्यदायक पर्याय ठरतात.




मिल्क चाय टोस्ट च्या एका पॅकची किंमत ८ रुपये आणि ब्राउन चाय टोस्टची किंमत १० रुपये आहे. मिल्क चाय टोस्ट हा दुधाने समृद्ध असून त्यामध्ये आवश्यक पोषक तत्वे आणि समृद्ध चव प्रदान करतो. तो परिपूर्णतेपणे भाजून त्याला कुरकुरीत बनविला जातो. गहू, सोया पीठ आणि माल्ट पीठापासून बनवलेला ब्राउन चाय टोस्ट हा फायबरने समृद्ध असलेला पर्याय असून तो पचनक्रियेला मदत करतो. पौष्टिक आणि हलका नाष्ट्याच्या शोधात असलेल्यांसाठी हा आदर्श पदार्थ आहे. आरोग्य आणि सोय याबद्दल आपली कटिबद्धता व्यक्त करताना मालपाणीज् बेकलाईट चे व्यवस्थापकीय संचालक श्री. सचिन मालपाणी म्हणाले "आमचे चहा टोस्ट तुमच्या चहाच्या वेळेला पूरक ठरतील. चव आणि स्वच्छतेशी तडजोड न करता आरोग्याबाबत जागरूक जीवनशैलीशी ते सुसंगत असतील, अशा रीतीने ते बनविलेले आहेत.

मोठ्या संख्येने व्यावसायिक चहाच्या ब्रेकच्या वेळेस झटपट तसेच पौष्टिक पर्याय शोधत आहेत. त्यांच्यासाठी चाय टोस्ट्सच्या रूपाने एक स्वादिष्ट आणि स्वच्छ पर्याय उपलब्ध झाला आहे. प्रवासासाठी सोयीचे असलेले हे टोस्ट्स भारतातील लोकप्रिय पेयाच्या प्रथेसाठी अत्यंत पूरक आहेत.

---

## थोडक्यात



### राजगुरू महाविद्यालयात जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

**राजगुरुनगर (आरंभ पर्व) : राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयात जागतिक महिला दिनानिमित्त व्याख्यान, स्त्रीवादी कवितांचा जागर, पोस्टर प्रदर्शन, मनोरंजनपर खेळ अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. एच.एम.जरे, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी.कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, समन्वयक डॉ. श्वेतांबरी मांडे, सर्व महिला प्राध्यापिका व विद्यार्थिनी उपस्थित होत्या. विद्यार्थिनी कल्याण मंडळाच्या वतीने रोहिणी गव्हाणे यांचे 'शिक्षण आणि महिला सबलीकरण' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. पौराणिक, ऐतिहासिक व समकालीन अशा प्रत्येक काळात आपापल्या क्षेत्रात कर्तृत्ववान महिलांची उदाहरणे देऊन त्यांनी विद्यार्थिनींना सक्षम होण्याचे आवाहन केले.**

---

# 'लिवा मिस लिवा २०२४'च्या विजेत्यांची घोषणा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

'लिवा मिस लिवा २०२४' ग्रँड फिनाले ही फॅशन, ग्लॅमर, प्रतिभा आणि सशक्तीकरणाची एक अविस्मरणीय रात्र ठरली, ज्यामध्ये सौंदर्य, फॅशन डिझाइन आणि आशय निर्मितीमध्ये भारतातील सर्वांत आशादायी तारकांना प्रदर्शित करण्यात आले. 'बिर्ला सेल्युलोज'चा १०० टक्के नैसर्गिक मूळ फॅब्रिक ब्रँड असलेला 'लिवा' जो त्याच्या अद्वितीय प्रवाहीपणा, कोमलता आणि श्वासोच्छवासासाठी प्रसिद्ध आहे. लिवा सलग पाचव्या वर्षी शीर्षक प्रायोजक म्हणून 'मिस लिवा'मध्ये अभिमानाने सामील झाला आहे. हे सहयोग विनासायास आहे, कारण दोन्ही ब्रँड स्वतंत्र महिलांना प्रोत्साहन देतात, ज्या मुक्त, उत्स्फूर्त/ स्वयंप्रेरित आणि हरहुन्नरी आहेत.



कार्यक्रमात आयुषी मलिकला 'लिवा मिस लिवा सुपरनॅशनल २०२४' आणि विप्रा मेहताला 'लिवा मिस लिवा कॉस्मो २०२४'चा मुकुट देण्यात आला. या अनन्यसाधारण महिला अनुक्रमे 'मिस सुपरनॅशनल २०२५' आणि 'मिस कॉस्मो २०२५'मध्ये जागतिक मंचावर भारताचे प्रतिनिधित्व करतील. तसेच आंतरराष्ट्रीय सौंदर्य स्पर्धांमध्ये देशाचा गौरवशाली वारसा पुढे नेतील.

रंगीत सायंकाळी एक ऐतिहासिक मैलाचा दगडदेखील चिन्हांकित करण्यात आला, जेव्हा दोन नवीन श्रेणीतील विजेते पहिल्यांदाच घोषित झाले. ओडिशातील सुध्रुती पदियारी हिला 'लिवा मिस लिवा फॅशन डिझायनर २०२४' घोषित करण्यात आले, तर बिहारमधील अनन्या प्रवीणने 'लिवा मिस लिवा कंटेंट क्रिएटर २०२४'चे विजेतेपद पटकावले. त्यांचा विजय हा 'लिवा मिस लिवा'च्या नवनिर्मितीला अधोरेखित करतो, जो केवळ रॅम्पवरील उत्कृष्टतेप्रमाणेच सर्जनशीलता, कारागिरी आणि सतत विस्तारणाऱ्या फॅशन उद्योगातील डिजिटल प्रभावाचाही उत्सव साजरा करतो.

प्रतिष्ठीत ज्युरी पॅनेलमध्ये उद्योग क्षेत्रातील दिग्गजांचा समावेश होता, ज्यात अनुभवी मार्गदर्शक रितिका खटनानी (लिवा मिस लिवा ब्युटी क्वीन २०२४), सोनाक्षी राज (लिवा मिस लिवा फॅशन डिझायनर २०२४) आणि भावना सिंग (लिवा मिस लिवा कंटेंट क्रिएटर २०२४) त्याचबरोबर सेलिब्रेटी डिझायनर मंदिरा विर्क, अभिनेता फरदीन खान, 'मिस कॉस्मो २०२४' केतुत पर्माटा ज्युलियास्ट्रिड आणि 'मिस सुपरनॅशनल २०२३' अँड्रिया अगुइलेरा आदींचा यात समावेश होता.

'लिवा मिस लिवा ब्युटी क्वीन २०२४'च्या अंतिम स्पर्धकांनी डिझायनर जोडी जॉन आणि अनंत यांनी बनवलेल्या आकर्षक पोशाखात मंचावर येण्याआधी 'फो'द्वारे (पीएचओ) दमदार रॅप परफॉर्मन्सने गर्दीत प्रेक्षकांमध्ये उत्साह निर्माण केला. त्यांचा संग्रह, 'ऑब्सिडियन ड्रीम्स' ताकद, गूढता आणि परिष्कृत अत्याधुनिकतेचे प्रतीक आहे, ज्यामुळे अंतिम स्पर्धकांना परिचय फेरीसाठी आणि संवादात्मक सत्रासाठी परिपूर्ण पार्श्वभूमी निर्माण झाली. आत्मविश्वास, वक्तृत्व आणि आकर्षणाद्वारे या महिलांनी आधुनिक सौंदर्य - बुद्धिमत्ता, दृढ विश्वास आणि प्रेरणा देण्याची शक्ती यांचे मूर्तिमंत रूप धारण केले.

सायंकाळच्या रमणीयतेत भर घालत, 'सारेगामा'च्या प्रतिभावान कलाकार प्रगती नागपाल आणि अर्जुन तंवर यांनी त्यांच्या सुरेल आवाजाने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करणारे एक हृदयस्पर्शी संगीत सादरीकरण सादर केले. विजेत्यांच्या घोषणेसह महाअंतिम फेरीची उत्कंठा शिगेला पोहोचली आणि जागतिक मंचावर त्यांच्या परिवर्तनकारी प्रवासाची सुरुवात झाली. सौंदर्य, महत्त्वाकांक्षा आणि अमर्याद शक्यतांचे सार टिपणाऱ्या खास फोटोंनी नयनरम्य कार्यक्रमाची सांगता झाली.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.